**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १३ वा ● मंगळवार ३० मे २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 13 | Date : 30/05/2023 | blow :Tuesday | Page 4 | Price 4

## चेन्नई पाचव्यांदा आयपीएल चॅम्पियन

### रवींद्र जडेजा ठरला हिरो! एम. एस. धोनीच्या नेतृत्त्वाखाली गुजरातला नमवत चेन्नईने पाचव्यांदा आयपीएल चषकावर कोरले नाव

गुजरात : आयपीएल २०२३च्या अंतिम फेरीत गतविजेत्या गुजरात टायटन्सचा सामना चेन्नई सुपर किंग्जशी होत आहे. हा सामना रविवारीच होणार होता. मात्र, २८मे चा दिवस पावसाने वाहून गेला. आता हा सामना आज राखीव दिवशी खेळला गेला. सोमवारी चेन्नईचा कर्णधार धोनीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना गुजरातने २० षटकांत ४ गडी गमावून २१४ धावा केल्या. यानंतर पावसामुळे डकवर्थ लुईस नियमानुसार चेन्नईला १५ षटकांत १७१ धावांचे लक्ष्य मिळाले. रवींद्र जडेजाने मोहित शर्माच्या शेवटच्या षटकातील दोन चेंडूवर षटकार आणि चौकार मारत रोमहर्षक विजय मिळवला.



गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्या दरम्यान झालेल्या या सामन्यात पावसाने मोठा व्यत्यय आणला. मात्र, रात्री उशिरापर्यंत झालेल्या या सामन्यात अखेर एमएस धोनी याच्या नेतृत्वातील चेन्नई सुपर किंग्जने विजय मिळवला. सीएसके आता आयपीएल इतिहासात पाच वेळा चॅम्पियन ठरणारा दुसरा संघ ठरला आहे. गुजरात टायटन्सला सलग दुसऱ्या आयपीएल हंगामात विजेतेपद आपल्याकडे राखता आले नाही. सीएसकेच्या आघाडीच्या फलंदाजांनी सुरुवातही दणक्यात करून दिली, परंतु गुजरातचे हुकमी एक्के नूर अहमद व मोहित शर्मा यांनी मॅच फिरवली होती. पण, धोनीला विक्रमी पाचवे जेतेपद जिंकून देण्यासाठी ते अपयशी ठरले. रवींद्र जडेजाने थरारक सामन्यात अखेरच्या दोन चेंडूत १० धावा चोपून विजय मिळवून दिला.

नियोजित कार्यक्रमानुसार हा अंतिम सामना २८मे रोजी खेळला जाणार होता. मात्र, या दिवशी एकाही चेंडूचा खेळ झाला नाही. परिणामी सामना राखीव दिवशी म्हणजेच सोमवारी (२९मे) खेळवण्यात आला. चेन्नईचा कर्णधार एमएस धोनी याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. शुबमन गिल व ऋद्धिमान साहा या जोडीने संघाला पुन्हा एकदा अर्धशतकी सलामी दिली. गिलने ३९ तर साहाने ५४ धावांचे योगदान दिले. मात्र, गुजरातच्या डावाचा नायक युवा साई सुदर्शन हा ठरला. त्याने ४७ चेंडूवर ९६ धावांची शानदार खेळी केली. त्याच्या योगदानामुळे गुजरातने ४ बाद २१४ धावा केल्या.

या सामन्यात साई सुदर्शनने गुजरातकडून सर्वाधिक ९६ धावा केल्या. त्याचवेळी ऋद्धिमान साहाने ५४ धावांची खेळी केली. शुबमन गिलने ३९आणि हार्दिक पांड्याने नाबाद २१ धावा केल्या. चेन्नईचे सर्व गोलंदाज चांगलेच महागडे ठरले. पाथिरानाने दोन गडी बाद केले. चहर आणि जडेजा यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. चेन्नईकडून कॉनवेने सर्वाधिक ४७ धावा केल्या, पण सर्व फलंदाजांनी चांगले योगदान दिले. गुजरातकडून मोहित शर्माने तीन आणि नूरने दोन विकेट घेतल्या. चेन्नई सुपर किंग्जने पाचव्यांदा अंतिम सामना कसा जिंकला ते समजून घेऊया. मोहित शर्माने शानदार गोलंदाजी । पान २ वर

## दक्षिण सोलापूर तालुक्यातील काही ठिकाणी सौम्य भूकंपाची नोंद

### नागरिकांनी घाबरून न जाण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुक्यातील काही ठिकाणच्या परिसरात १.३ रिश्टर स्केलच्या भूकंपाची नोंद झाली आहे. हा भूकंप खूप कमी तीव्रतेचा असल्याने कोणतीही जीवित व वित्त हानी झालेली नाही. तरी नागरिकांनी अफवांना बळी न पडता कोणत्याही प्रकारची भीती बाळगू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तुषार ठोंबरे यांनी केले आहे.

यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शमा पवार यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, दक्षिण सोलापूर तालुक्यातील आचेगाव, होटगी स्टेशन, मंद्रुप, हिपळे, फताटेवाडी, औज आहेरवाडी, तिल्हेहाळ, कणबस व बोरूळ या परिसरामध्ये दि. २९/५/२०२३ रोजी दुपारी १.२० वाजेच्या दरम्यान सौम्य आवाज ऐकू आल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाल्याची बाब तहसिलदार दक्षिण सोलापूर यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या निदर्शनास आणून आणून दिली. सदर बाबीची पडताळणी करिता, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजी, नवी दिल्ली यांच्याकडे शहानिशा केली असता, सोलापूर शहर (वालचंद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी) परिसरातील नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीच्या भूकंप मापक स्टेशनमध्ये १.३ रिश्टर स्केलच्या भूकंपाची नोंद झाली असल्याचे सांगितले.

तरी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, उपरोक्त स्केलचा भूकंप खूप कमी तीव्रतेचा असल्याने कोणतीही जीवित व वित्त हानी झालेली नाही.

तरी नागरिकांनी अफवांना बळी न पडता कोणत्याही प्रकारची भीती बाळगू नये, असे आवाहन प्रसिद्धीपत्रकात करण्यात आले आहे.

## चंद्रपुरातील काँग्रेसचे खासदार बाळू धानोरकर यांचं निधन

चंद्रपूरा : चंद्रपूरचे काँग्रेसचे खासदार बाळू उर्फ सुरेश धानोरकर यांचं निधन झालं. दिल्ली इथल्या मेदांता रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पित्ताशय आणि स्वादुपिंडामध्ये इन्फेक्शन झाल्याने धानोरकर यांना नागपूर इथून एअर ॲम्ब्युलन्सने दिल्ली इथल्या मेदांता रुग्णालयात नेण्यात आलं होतं.



त्यांची प्रकृती चिंताजनक होती. अखेरे उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. सकाळी एअर ॲम्ब्युलन्सने त्यांचं पार्थिव चंद्रपुरात आणण्यात येईल. तर उद्या वरोरा इथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहेत. बाळू धानोरकर यांचे बंधू अनिल धानोरकर यांनी ही माहिती दिली. लोकसभेतील काँग्रेसचे महाराष्ट्रातील एकमेव खासदार असलेले बाळू धानोरकर हे अनेक वर्षे शिवसेनेत होते. शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक वर्ष काम पाहिलं. २०१४ ते २०१९ दरम्यान ते वरोरा मतदारसंघाचे शिवसेना आमदार होते. विधानसभा निवडणुकीत माजी मंत्री संजय देवतळे यांचा त्यांनी पराभव केला होता. यानंतर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत बाळू धानोरकर काँग्रेसच्या तिकीटावर लढले आणि माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर यांना पराभूत करुन खासदार झाले होते.

## आपत्तीला तोंड देण्यासाठी प्रत्येक विभागाने राज्य आपत्ती प्रतिसाद दल नेमावे; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

मुंबई : विविध नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढत असून प्रत्येक विभागीय आयुक्तालयाच्या ठिकाणी राज्य आपत्ती प्रतिसाद दल नेमावे, तसेच पालिकांनी देखील त्यांच्या स्तरावर आपत्तीत तत्काळ बचाव कार्य करणारी पथके तयार करावीत अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या. आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. राज्य आपत्ती धोके व्यवस्थापन निधीचा प्रभावीपणे खर्च करा तसेच कोकण आपत्ती सौम्यीकरण कामे त्वरित सुरु करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. या बैठकीत राज्य आपत्ती धोके व्यवस्थापन निधीचा खर्च, कोकण आपत्ती सौम्यीकरण कामे, कोविड व विविध प्रसंगी करण्यात आलेल्या बचाव कार्याचा खर्च, ई पंचनामे, आपदा मित्र, ई सचेत प्रणाली आदि मुद्द्यांवर मदत व पुनर्वसन प्रधान सचिव असीम गुप्ता यांनी सादरीकरण केले.



मुख्यमंत्री यावेळी म्हणाले की, एनडीआरएफ कंपन्या राज्यात प्रत्येक ठिकाणी आपत्तीमध्ये वेळेत पोहचू शकत नाहीत, यासाठी राज्यात सातही विभागांच्या ठिकाणी राज्य आपत्ती प्रतिसाद दले नेमण्याची कार्यवाही व्हावी. सध्या एसडीआरएफच्या दोन तुकड्या धुळे आणि नागपूर येथे आहेत. याशिवाय राज्यात ही दले असतील. ठाणे येथे महानगरपालिकेने आपत्ती प्रतिसादासाठी वेळेत धाऊन जाणारे दल तयार केले असून त्यांनी विशेषत: इमारत दुर्घटनामध्ये उत्तम काम केले आहे असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, ज्या ठिकाणी उंच इमारती आहेत तसेच आपत्तींची शक्यता जास्त आहे अशा ठिकाणी पालिकांनी आपली बचाव दले तयार करावीत.

राज्यात कोकण भागास वारंवार वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागते. राज्य मंत्रिमंडळाने यापूर्वीच ३२०० कोटी रुपये कोकणात विविध आपत्ती निवारण कामे करण्यासाठी मंजूर केले आहेत. यामध्ये भूमिगत वाहिन्या, धूप प्रतिबंधक बंधारे, बांध घालणे,। पान २ वर

## भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू ; यात्रेवरून परतणाऱ्या कुटुंबावर घाला

सोलापूर/प्रतिनिधी : यल्लम्मा देवीच्या यात्रेसाठी आलेल्या एका कुटुंबीयाच्या मोटारीला मालमोटारीने जोरात धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला आहे. कर्नाटकातील हास्पेटजवळ ही दुर्घटना घडली. मृतांमध्ये सर्वजण एकाच कुटुंबातील आहेत. राघवेंद्र सुभाष कांबळे (वय २५), त्यांच्या पत्नी जानू राघवेंद्र कांबळे (वय २३), त्यांची मुले राकेश (वय ५) आणि रश्मिका (वय २) अशी मृतांची नावे आहेत. या अपघातात शेजारच्या इंडी (कर्नाटक) तालुक्यातील नंद्राळ येथील दोन नातेवाइकांचाही मृतांमध्ये समावेश आहे. त्यांची नावे समजू शकली नाहीत. मृत राघवेंद्र कांबळे हे मूळचे दक्षिण सोलापूर तालुक्यातील लवंगी गावचे राहणारे होते. बंगळुरू येथे एका खासगी कंपनीत ते नोकरीस होते. पत्नी व मुलांसह ते बंगळुरूत राहात होते. दरवर्षीप्रमाणे लवंगी गावात यल्लम्मा । पान २ वर


## पुण्यात काही परिसरात गारपीट

पुणे : पुण्यात मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. तर काही परिसरात गारपिटीला सुरुवात झाली आहे. अचानक आलेल्या या पावसाने अनेक पुणेकरांची तारांबळ उडाली आहे. दिवसभर पुण्यात उकाडा जाणवत होता. मात्र पावसामुळे पुणेकरांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. भुगाव, सांगवी, औंध या परिसरात गारपीट झाली तर बाकी परिसरात मुसळधार पावसानं हजेरी लावली. त्यासोबतच पिंपरी चिंचवडमध्ये मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली. गेल्या काही दिवसांपासून शहरवासीय उकाड्याने हैराण झाले होते. आज सकाळपासूनही उन्हाच्या झळा बसत होत्या. अशातच सायंकाळी ढग दाटून आले आणि पावसाने हजेरी लावली.

अचानक आलेल्या पावसामुळं नागरिकांची त्रेधातिरपीट उडाली. या पावसामुळं परिसरात गारवा निर्माण झाल्यानं शहरवासीय मात्र सुखावले आहेत. पुढील पाच दिवस पुण्यात काही प्रमाणात ऊन आणि काही प्रमाणात पावसाची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. उद्या (३०) दिवसभर काही प्रमाणात ऊन असेल मात्र संध्याकाळी मुसळधार पावसाची शक्यता असल्याचं हवामान खात्याकडून सांगण्यात आलं आहे. त्यानंतर पुढील चार दिवस आकाश निरभ्र राहण्याची शक्यता आहे आणि काही प्रमाणत पावसाचीदेखील शक्यता वर्तवण्यात आली आहे. मागील काही दिवसांपासून पुण्यात सातत्याने तापमानात वाढ होत होती. तापमानाचा पारा ४० अंशावर पोहचला होता. त्यामुळे पुणेकर हैराण झाले होते. तापमान वाढत असल्याने पुण्यात हीट वेव्ह येणार का?, असा प्रश्न अनेक पुणेकरांना पडला होता. मात्र अशी कोणत्याही प्रकारची हीट वेव्ह येणार नसल्याचं हवामान खात्याच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं होतं. आज आलेल्या पावसाने पुणेकरांना मात्र चांगलाच दिलासा मिळाला आहे.

## स्थानिक गुन्हे शाखा,सोलापूर ग्रामीण यांची धडाकेबाज कामगिरी

### दिवसा घरफोडी करणारा अंतर जिल्हा अट्टल गुन्हेगार जेरबंद, १० दिवसा घरफोडी व १ जबरी चोरीचा असे एकुण ११ गुन्हे उघड, ५,१८,६०० रुपये किमतीचे सोने चांदीचे दागिने हस्तगत.



सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर ग्रामीण जिल्हयातील घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणुन सदर गुन्हयांना प्रतिबंध मा. पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण श्री शिरीष सरदेशपांडे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांना सुचना दिल्या होत्या सदर सुचना प्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांनी सहा पोलीस निरीक्षक धनंजय पोरे यांना जिल्हातील दिवसा व रात्री घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत आदेशीत केले होते. नमुद आदेशाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेकडील सहा पोलीस निरीक्षक धनंजय पोरे व त्यांचे पथक सोलापूर ग्रामीण जिल्हयातील दिवसा घरफोडी करणा-या आरोपीत यांचा गोपनिय बातमीदार या व्दारे शोध घेत असताना आरोपी याचे घटनास्थळी संशयास्पद अस्तित्व आढळुन आले.

सदर पथकाने आरोपीत याचा करमाळा येथे सापळा रचुन अत्यंत कौशल्याने आरोपीत यास ताब्यात घेतले. सदर आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचे विरुध्द बीड उस्मानाबाद, लातुर, सोलापूर ग्रामीण जिल्हयात दिवसा घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपी हा नेहमी वेगवेगळे साथीदार घेवुन गुन्हे करीत असतो. सदर आरोपीकडे स्थानिक गुन्हे शाखेच्या नमुद पथकाने केलेल्या कौशल्यापुर्ण तपासामुळे आरोपीत याने सोलापूर ग्रामीण जिल्हयात सन २०२३ मध्ये जानेवारी महिन्यापासुन आजतागायत एकुण १० दिवसा घरफोडीचे गुन्हे त्याचे साथीदारा समवेत केल्याची कबुली दिली आहे.

तसेच आरोपी याने त्योच साथीदारा समवेत सन-२०२२ मध्ये करमाळा पोलीस ठाणे हद्दीत जबरी चोरीचा गुन्हा केले असल्याचे सांगितले आहे. आरोपीत याचेकडुन करमाळा पोलीस ठाणे ४ गुन्हे, कुर्डुवाडी पोलीस ठाणे ३ गुन्हे, बार्शी शहर, टेंभुर्णी व करकंब पोलीस ठाणे प्रत्येकी १ गुन्हा असे एकुण १० दिवसा घरफोडीचे गुन्हे तसेच करमाळा पोलीस ठाणेचा १ जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे. नमुद आरोपी यास करमाळा पोलीस ठाणे गुरंन ७७१/२०२३ भादंवि क ३९४, ३४ या गुन्हयात अटक करण्यात आली असुन त्याची दिनांक १८/०५/२०२३ ते २५/०५/२०२३ या मुदतीत पोलीस कोठडी घेण्यात आली असुन मुदतीत आरोपीत याचेकडुन वर नमूद एकुण ११ गुन्ह्यातील ५,१८,६००/- रु.चे सोने चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे.

सदर गुन्हयाचा तपास श्रेणी पोलीस उप-निरीक्षक, राजेश गायकवाड, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण हे करीत आहेत. सध्या आरोपी करमाळा पोलीस ठाणे यांचे पोलीस कस्टडीत आहे.

नमुद आरोपी हा सन २०२२ मधील सोलापूर ग्रामीण जिल्हयातील एकुण ६ दिवसा घरफोडीचे गुन्हयामध्ये पाहिजे आरोपी आहे.सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण श्री. शिरीष सरदेशपांडे, व अपर पोलीस अधीक्षक, श्री. हिम्मत जाधव, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सुहास जगताप स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण. यांचे नेत्तृत्वाखाली सहा.पोलीस निरीक्षक/ धनंजय पोरे, श्रेणी पोसई/ राजेश गायकवाड, सपोफौ/ श्रीकांत गायकवाड, सपोफौ/बिराजी पारेकर, निलकंठ जाधवर, पोहवा/सलीम बागवान, विजयकुमार भरले, हरिदास पांढरे, आबासाहेब मुंढे, पोना/रवी माने, पोकॉ/ समर्थ गाजरे, विनायक घोरपडे, चापोशि/दिलीप थोरात, पोना/ व्यंकटेश मोरे ने. सायबर पो.स्टे यांनी केली आहे.

## ✻ सुविचार ✻

शिक्षण म्हणजे मानवाच्या अंगी जे सुप्त पूर्णत्व आहे, त्याचेच प्रकटीकरण होय.- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### अशी अपेक्षा करावी का?

महिलांमध्ये स्तनांच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. भारतात दर चार मिनिटाला एका महिलेमध्ये या प्रकारच्या कर्करोगाची लक्षणे जाणवतात असा निष्कर्ष ब्रेस्ट कॅन्सर ऑफ इंडिया या संस्थेच्या अहवालात नमूद आहे. या रोगाचे निदान वेळेत व्हावे यासाठी राज्य सरकारने एक निर्णय जाहीर केला आहे. प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयात स्तनांचा कर्करोग बाह्यरुग्ण विभाग सुरु करण्यात येणार आहेत. प्रत्येक महाविद्यालयाकडून ५० गावे दत्तक घेऊन एका महिन्यात २१ तपासणी शिबिरे घेतली जातील. ३० ते ६४ वयोगटातील सुमारे दहा लाख महिलांची तपासणी केली जाईल. तपासणीचे हे सत्र दोन वर्षे चालवले जाईल. दोन वर्षांनंतर संशयित महिलांची पुन्हा तपासणी केली जाईल. बाधित महिलांवर तातडीने उपचार केले जातील, असे राज्याच्या वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांनी सांगितले. या निर्णयाची नियोजनबध्द अंमलबजावणी झाली तर त्याचा महिलांना निश्‍चितच फायदा होऊ शकेल. महिला स्वतःच्या आरोग्याकडे होता होईल तेवढे दुर्लक्ष करतात. त्या छोट्या- मोठ्या दुखण्यांकडे दुर्लक्ष तर करतातच पण लक्षणे जाणवली तरी कॅन्सरचे निदान होईल या भीतीने तपासणी टाळण्याकडेच महिलांचा कल असतो. कॅन्सरवरचे महागडे उपचार हेही त्याचे एक कारण ठरते. प्राथमिक तपासणीच्या सुविधा ग्रामीण भागात सर्वत्र सारख्याच उपलब्ध असतील असे नाही. कोरोना काळात लोक मोठ्या प्रमाणात सरकारी आरोग्य व्यवस्थेवरच अवलंबून होते. व्यवस्थेनेही रुग्णांना निराश केले नव्हते. कोरोना काळात जीवाची पर्वा न करता रुग्णसेवा करणाऱ्या डॉक्टर आणि सरकारी आरोग्यसेवकांबद्दल समाजाने वेळोवेळी कृतज्ञताही व्यक्त केली होती. तथापि सरकारी आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण करण्याची गरज असल्याचे जाणत्यांनी म्हटले आहे. तसे प्रयत्न सुरु असल्याचा जनतेचा अनुभव नाही. शिवाय कॅन्सरबाबत जनजागृतीचाही अभाव आहेच. अशा कमतरता सरकारी निर्णयामुळे दूर होऊ शकतील. सरकार जनहिताचे निर्णय जाहीर करत असते. तथापि अंमलबजावणीअभावी अनेक निर्णय फाइलीपुरतेच मर्यादित राहतात. सरकार निर्णय घेते आणि त्याची अंमलबजावणी प्रशासन करते. सरकारी सेवकांची काम करण्याची मानसिकता हा नेहमीच चर्चेचा विषय असतो. हाही जनहिताच्या निर्णयांच्या अंमलबजावणीतील अडथळा ठरत असेल का? तीच परिस्थिती सरकारी आरोग्य योजनांच्या बाबतीत आढळते से गाऱ्हाणे लोक मांडतात. उपरोक्त निर्णयाबाबत असे घडणार नाही, अशी अपेक्षा करावी का?

# सक्षम भारताचा एकच नारा, नको तंबाखूला थारा

भारतात इतर देशांच्या मानाने तंबाखूमुळे मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या दरवर्षी वाढत असल्याचा अंदाज आहे. दि. ३१ मे रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिनाच्या पार्श्वभूमिवर जिल्हा मुख आरोग्य अधिकारी डॉ. रोहन वायचळ लिखित हा लेख या वर्षीचे घोषवाक्य वुई नीड फूड, नॉट टोबॅको आहे. तंबाखूमुळे दर ८ सेकंदाला 'एक' मृत्यु घडतो. भारतात, तंबाखू संबंधित मृत्युची एकूण संख्या दर वर्षी ८ ते ९ लाखइतकी असेल. तंबाखूपासून दूर राहिल्यास एक किशोर/किशोरीचा जीवनकाळ २० वर्षाने वाढू शकेल.

तंबाखूच्या सेवनाने अनेक दुष्परिणाम :- तोंडाचा कर्करोग, ओठाचा, जबड्याच्या, फुफ्फुसाचा, घशाचा, पोटाचा, किडनीचा व मूत्राशयाचा कॅन्सर इत्यादी तंबाखू सेवनाने होतात. भारतात तंबाखू सेवनामुळे तोंडाचा कॅन्सर होणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. ९० टक्के फुफ्फुसाचा कॅन्सर आणि इतर कॅन्सर होण्याचे कारण हे धूम्रपान आहे.

भारतात तंबाखूच्या सेवनामुळे तोंडाचा कर्करोग असलेल्या रूग्णांची संख्या सर्वांत मोठी आहे. भारतात, ५६.४ % स्त्रियांना आणि ४४.९ % पुरुषांना तंबाखूमुळे कर्करोग झाल्याचे आढळून आले आहे. भारतात ८२ % फुफ्फुसाच्या दीर्घकालीन रोगांचे कारण धूम्रपान हे आहे. तंबाखू हे क्षयरोग होण्याचे अप्रत्यक्ष कारण आहे. कधी-कधी धूम्रपान करणाऱ्यांमध्ये देखील टीबी, तिप्पट अधिक आढळतो. सिगरेट किंवा बिड़ीचे धूम्रपान, जितके अधिक, तितके अधिक टीबीचे प्रचलन वाढू शकते. धूम्रपान/ तंबाखूचे सेवन अचानक रक्तदाब वाढविते आणि हदयाकडे जाणारा रक्तपुरवठा कमी करते. यामुळे पायाकडे होणाऱ्या रक्तप्रवाहात देखील कमतरता येते आणि पायात गैंग्रीन होऊ शकते. तंबाखू संपूर्ण शरीराच्या धमन्यांच्या पापुद्र्याला नुकसान पोहोचवते. मुलांच्या आरोग्यावर धूम्रपानाचा वाईट परिणाम होतो आणि कुटुंबातल्या इतर सदस्यांवर देखील धूम्रपानाच्या धुराने त्रास होतो. धूम्रपान न करणारा पण २ पाकिट रोज धूम्रपान




करणाऱ्या बरोबर राहिल्यास, न करणा-यास रोज ३ पाकिट धूम्रपान करणाऱ्याइतका त्रास होतो, हे लघवीच्या निकोटिनच्या पातळीचा अभ्यास करता आढळून आले.

तंबाखू किंवा धूम्रपानामुळे मधुमेह होण्याची शक्यता जास्त बळावते. तंबाखूमुळे रक्तातील चांगले कोलॅस्ट्रॉलचे प्रमाण कमी होते. धूम्रपान करणारे/तंबाखू सेवन करणारे यांच्यात, धूम्रपान न करणाऱ्यांच्या तुलनेत हृदय रोग व पक्षाघात होण्याचा धोका २ ते ३ पट अधिक वाढतो.

धूम्रपान / तंबाखूचे स्त्री व पुरुषांवर दुष्परिणाम होतात. याचे सेवन पुरुषांमध्ये नपुंसकतेचे कारण आहे. धूम्रपान / तंबाखूचे सेवन स्त्रियांमध्ये इस्ट्रोजनची पातळी कमी करते व रजोनिवृत्ति लवकर होते. धूम्रपान / तंबाखूचे सेवन शारीरिक ताकद कमी करते आणि त्यामुळे सहनशीलता ढासळते. ज्या स्त्रिया धूम्रपान करतात आणि गर्भनिरोधके घेतात त्यांच्यात स्ट्रोकचा धोका वाढतो. ज्या गरोदर स्त्रिया, धूम्रपान करतात, त्यांच्यात गर्भपाताची शक्यता वाढते, किंवा मूल कमी वजनाचे होते, किंवा बाळाच्या विकासात्मक समस्या वाढतात, किंवा बाळाचा अचानक मृत्यु देखील ओढवू शकतो. (अचानकपणे झालेला अनाकलित मृत्यु).

**तंबाखू सोडण्याचे शारीरिक फायदे**

तुमच्यातील कँसर वा हदयरोग होण्याचे धोके कमी होतात. हदयावर येणारा दाब कमी होतो. तुमच्या धूम्रपान करताना सोडलेल्या धुराचा त्रास तुमच्या आपल्यांवर होणार नाही. तुम्हाला धूम्रपानामुळे होणारा खोकला (सारखा होणारा खोकला व कफ) नाहीसा होईल. तुमचे दात स्वच्छ व शुभ्र होतील.

**सामाजिक फायदे**

तुम्ही स्वतः नियंत्रक व्हाल, सिगारेट तुमच्यावर नियंत्रण ठेवणार नाही. तुमची आत्म-शक्ती तथा आत्मविश्वास वाढेल. आज व या नंतर भविष्यात तुम्ही तुमच्या मुलांसाठी एक निरोगी पालक (पिता/माता) बनाल. तुमच्याकडे इतर गोष्टींवर खर्च करण्यासाठी पैसा असेल.

**धूम्रपान/तंबाखू सोडण्यासाठी युक्त्या**

ऐशट्रे, सिगरेटी, पान, ज़र्दा लपवून ठेवा, जे नजरेसमोर नसते ते आठवत पण नाही. हा एक सोपा, परंतु सहाय्यक उपाय आहे. सिगरेटी, पान आणि ज़र्दा लवकर मिळतील अशा ठेवू नका. सिगरेटी, पान आणि ज़र्दा अशा जागी ठेवा जेथून तुम्हाला काढणे वा सापडणे अवघड पडेल. उदाहणार्थ, दुस-या खोलीत, किंवा तुम्ही नेहमी जात नाही अशा जागी, कुलुपाच्या कपाटात इ. धूम्रपान करण्यासाठी प्रेरित करणाऱ्या कारणांना ओळखा किंवा त्या ऐवजी पान खा / जर्दा खा आणि दुसरे उपाय शोधा.तुमचा कंपू किंवा गट, सिगरेटी, पान, ज़र्दा खातो कां ? असे असल्यास पहिल्यांदा त्यांना टाळायचा प्रयत्न करा किंवा ते जेव्हा, सिगरेटी, पान, ज़र्दा खात असतील तेव्हा त्यांच्या पासून दूर व्हा.

तोंडात च्युइंगम, चॉकलेट, पेपरमिंट, लॉज़ेंजेस ठेवण्याचा प्रयत्न करा व दीर्घ श्वास घेण्याचा सराव करा.

जेव्हा तल्लफ येईल तेव्हा, उभ्याने किंवा बसलेल्या अवस्थेत दीर्घ श्वास घ्या. एक पेला पाणी प्या आणि व्यायामाने देखील तल्लफ घालवण्यास मदत होते. जेव्हा तंबाखू सेवनाची तल्लफ येईल तेव्हा, तुमच्या मुलांबद्दल आणि त्यांच्या भवितव्याबद्दल विचार करा व तुमच्यावर तंबाखूमुळे होणा-या भयंकर रोगांचा विचार करा. सेवन थांबवण्याची एक तारीख ठरवा. मदतनीसाची मदत घ्या. तुमचे वेळा-पत्रक सिगरेट, पान, ज़र्दा सोडून आखा.जेव्हा तुम्हाला धूम्रपान/तंबाखूची तल्लफ लागेल तेव्हा काहीतरी वेगळे करायचा प्रयत्न करा. दोन सिगरेट पिण्यामध्ये विलम्ब करा. दीर्घ श्वास घ्या. पाणी प्या. स्वतःसाठी सकारात्मक बोला. स्वतःला पुरस्कृत करा. दररोज आरामाच्या तंत्रांचा वापर करा जसे (योग, चालणे, ध्यानधारणा, नृत्य, संगीत इत्यादी). कॅफीन आणि अल्कोहलचे सेवन सीमित करा. या व्यतिरीक्त, सक्रिय बना आणि पोषक आहार करा नियमित व्यायाम करा निरोगी व स्वस्थ तंदुरुस्त जीवन जगा.

**डॉ.रोहन वायचळ,**
**जिल्हा मुख आरोग्य अधिकारी**
**सोलापूर**

# बार्टी संशोधक विद्यार्थी आंदोलन आणि माध्यमिक मुख्याध्यापिका सौ.आशा नवनाथ रणखांबे

सौ.आशा नवनाथ रणखांबे कोठेही स्वतःची प्रसिद्धी न करता सामाजिक , शैक्षणिक , प्रसार माध्यम , पोलीस - ठाणे जिल्हा महिला दक्षता कमीटी इ. वेगवेगळ्या ठिकाणी घर संभाळत फार मोठे सामाजिक कार्य करीत असून महान विभूतीच्या वाटेवर चालत स्वतःला घडवत आहे. उत्कृष्ट सामाजिक काम करणारी माझी जीवनसाथी हिचे जेवढे कौतुक करावे तितके कमीच आहे. शिक्षणापासून वंचित असणाऱ्या आदिवासी कातकरी



विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा वाढवण्यासाठी अनेक प्रयत्न करून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे उत्कृष्ट कार्य करीत आहे. घरादार - परिवाराचा विचार न करता अहमदनगर , नाशिक, पुणे, पालघर - जव्हार, मोखाडा शहापुर आदिवासी कातकरी वाड्यांवरती जाऊन पालकांना कन्व्हेन्स करून शिक्षणाचे महत्त्व पटवून शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलांना शाळेत आणण्याचं काम करत आहे. ५२ दिवस आझाद मैदान येथे चाललेल्या बार्टी संशोधक विद्यार्थी कृती समिती, महाराष्ट्र राज्य आंदोलन यशस्वी झाले.

हे आंदोलन प्रसार माध्यमातून महाराष्ट्रात विविध जिल्ह्यात घेऊन जाण्याचे निस्वार्थी कार्य तिने केले. उत्कृष्ट कार्य करीत असताना कुठे ही तिने स्वतःच्या नावाची प्रसिद्धी करून स्वतःला मिरवले नाही की, मानपान मिळेल या हेतूने कधीच पाहिले नाही. चांगल्या समाजिक कार्याला आणि उपक्रमाला नेहमीच पाठबळ आणि प्राधान्य देत असते. अशी माणसे फारच दुर्मिळ असतात. बुद्धभूमी फाऊंडेशनने विद्यार्थ्यांच्या सहकार्यासाठी केलेल्या आवाहनाला योग्य प्रतिसाद देऊन आंदोलनाकडे लक्ष दिल्याबद्दल भदन्त गौतमरत्न महाथेरो संस्थापक - मुख्य विश्वथ बुद्धभूमी फाऊंडेशन, कल्याण मार्फत तिला सन्मानपत्र देऊन नुकतेच गौरविण्यात आले. लग्नाच्या वाढदिवसा निमित्ताने तिला अनेक आशीर्वादासह पुढील वाटचालीस उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा देतो

**लेखक - जीवन संघर्षकार**
**नवनाथ रणखांबे**

पान १ वरुन

### चेन्नई पाचव्यांदा आयपीएल ..

करत चेन्नई संघाला दडपणाखाली आणले होते. शेवटच्या षटकात १३ धावांचा बचाव करताना त्याने पहिल्या चार चेंडूत फक्त तीन धावा दिल्या. यानंतर रवींद्र जडेजाने षटकार आणि चौकार मारून चेन्नईला पाचवे विजेतपद मिळवून दिले. या सामन्यात धोनी पहिल्याच चेंडूवर बाद झाला. अशा स्थितीत सामना संपवण्याची जबाबदारी दुसऱ्या कोणाला तरी घ्यावी लागली आणि धोनीसोबत दशकभर खेळल्यानंतर जडेजाने आपण काय शिकलो हे दाखवून दिले.

पावसामुळे चेन्नई संघाला फायदा झाला. षटके कमी झाली आणि चेन्नईला १५ षटकांत १७१ धावांचे लक्ष्य होते. षटके कमी करून पाच झाली, पण धावगती फारशी वाढली नाही. चेन्नईच्या पूर्ण १० विकेट्स होत्या. अशा स्थितीत कॉनवे आणि ऋतुराज यांनी तुफानी सुरुवात केली. या दोघांनी मिळून चार षटकांच्या पॉवरप्लेमध्ये ५२ धावा जोडल्या. येथून चेन्नई संघ चांगल्या स्थितीत पोहोचला.

या सामन्यात चौथ्या षटकात अजिंक्य रहाणे फलंदाजीला आला, पण त्यामुळे त्याच्या फलंदाजीत काही फरक पडला नाही. पहिल्या चार चेंडूंत दोन षटकार मारून त्याने आवश्यक धावगती फारशी वाढू दिली नाही. पुढचे षटक नूरचे होते आणि त्याने ते काळजीपूर्वक खेळले. यानंतर राशिदच्या षटकात दोन चौकार मारत त्याने चेन्नईची धावसंख्या १०० धावांच्या पुढे नेली. सुरुवातीच्या ११ चेंडूत २६ धावा करत त्याने चेन्नई संघाला सामन्यात परत आणले. मोहित शर्माने त्याला बाद केले, पण त्यानंतर दुबेने लय पकडली आणि राशिदच्या स्पेलच्या शेवटच्या दोन चेंडूंवर दोन षटकार मारत चेन्नईला सामन्यात रोखले. त्याचवेळी रायुडूने आठ चेंडूंत १९ धावांची झंझावाती खेळी करत चेन्नईची स्थिती आणखी चांगली केली. रायुडूच्या खेळीचा परिणाम असा झाला की, सलग दोन चेंडूंत दोन विकेट्स गमावल्यानंतरही चेन्नईचा संघ सामन्यात कायम राहिला.

### आपत्तीला तोंड देण्यासाठी प्रत्येक ..

बहुउद्देशीय चक्रीवादळामधले आसरे बांधणे, दरडी प्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाय, वीज अटकाव यंत्रणा यांचा समावेश आहे. यासंदर्भातील तांत्रिक कार्यवाही पूर्ण करीत ही कामे तत्काळ सुरु करावीत अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

कोविड कारणांसाठी आजपर्यंत १ हजार ९७४ कोटी खर्च झालेला आहे. कोविड काळात झालेल्या मृत्यूंसाठी एकूण १०३८ कोटी रुपये मदत व पुनर्वसन विभागाने अनुदान वाटप केले आहे. प्रत्येक मृतांच्या नातेवाईकास ५० हजार रुपये राज्य शासनाने देण्याचे निश्चित केले होते. ५ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

मागील वर्षात विविध नैसर्गिक आपत्तींमुळे ४३७ जण मरण पावले असून ६८० जखमी जाहले आहेत. तर ४३४८ जनावरे मरण पावली आहेत अशी माहितीही विभागाने बैठकीत दिली. ७९०० आपदा मित्रांना प्रशिक्षण दिले असून राज्याला यासाठी २७ कोटी रुपये निधी मिळाला आहे असेही बैठकीत सांगण्यात आले.

एसडीआरएफमध्ये केंद्राकडून प्राप्त निधी आणि तितकाच राज्याचा हिस्सा असे यावर्षी म्हणजे २०२२-२३ मध्ये ३ हजार ९७४ कोटी प्राप्त झाले. एसडीआरएफच्या निकषांव्यतिरिक्त एकूण खर्च ३ हजार ८६३ कोटी ६५ लाख रुपये खर्च झाला आहे. तसेच जून ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या नुकसानीसाठी मदत व पुनर्वसन विभागाने शेतकऱ्यांना ७ हजार १५१ कोटी २५ लाख वाटप केल्याचेही सांगण्यात आले.सततचा पाऊस नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित केला असून त्वरित नुकसानभरपाई देण्याबाबत कार्यवाही करावी असेही मुख्यमंत्री म्हणाले.

पंचनाम्यांच्या पद्धतीत सुधारणा करून मोबाईल एपद्वारे पंचनामे करावेत यासाठी एमआर एसएसी या कंपनीस नियुक्त केले आहे. यातून केल्या जाणार्या ई पंचनाम्यानुसार १५ दिवसांत बाधितांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे अशी व्यवस्था तयार करण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. बैठकीस मुख्य सचिव मनोज सौनिक तसेच पोलीस महासंचालक रजनीश सेठ, मुख्यमंत्री सचिवालयातील तसेच इतर सचिव, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू..

देवीच्या यात्रेसाठी कांबळे हे कुटुंबीयांसह १५ दिवसांपूर्वी आले होते. यात्रा संपल्यानंतर ते कुटुंबीयांना घेऊन खासगी मोटारीने बंगळुरूला परत निघाले होते. वाटेत इंडी तालुक्यातील नंद्राळ येथून त्यांनी आपल्या दोन नातेवाईकांनाही मोटारीत सोबत घेतले होते.

मोटार कर्नाटकातील हा?स्पेटजवळ दोड्डीनाळ गावानजीक समोरून भरधाव येणाऱ्या मालमोटारीने कांबळे यांच्या मोटारीला जोरात धडक दिली. यात कांबळे दाम्पत्यासह त्यांची दोन्ही मुले आणि नातेवाईक अशा सर्व सहाजणांचा जागीच मृत्यू झाला.

या दुर्घटनेची माहिती इकडे लवंगी गावात समजताच संपूर्ण गावात शोककळा पसरली. मृत राघवेंद्र कांबळे हे आई-वडिलांस एकुलते एक होते. राघवेंद्र व त्यांच्या पत्नी जानू आणि दोन्ही मुलांचे पार्थिव सोमवारी दुपारी लवंगी गावात आणण्यात आले. नंतर सर्व मृतांवर सामूहिक अंत्यसंस्कार करण्यात आले.

# स्काऊट्स आणि गाइड्सचे कामकाज जुन्या नियमानुसार चालण्यासाठी सकारात्मक चर्चा : मंत्री गिरीष महाजन

मुंबई : महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाइड्स या संस्थेचे जुन्या नियमानुसार कामकाज करण्यासाठी सकारात्मक चर्चा करण्यात आली असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीष महाजन यांनी सांगितले.सह्याद्री अतिथीगृहात महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाईड्स या संस्थेच्या राज्य मुख्य आयुक्त पदाची निवडणूक घेण्याबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार चंद्रशेखर बावनकुळे, क्रीडा व युवक कल्याण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, आयुक्त सुहास दिवसे यांची उपस्थिती होती.

मंत्री श्री. महाजन म्हणाले की, महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाइड्स या संस्थेची नव्याने तयार करण्यात आलेली नियमावली मंजुरीसाठी शासनास पाठविण्यात आली आणि त्यास शालेय शिक्षण व क्रीडा विभागाद्वारे मान्यता प्रदान करण्यात आली आहे. ही नियमावली भारत स्काऊट्स आणि गाइड्स



राष्ट्रीय कार्यालय, नवी दिल्ली यांना पाठविण्यात आली आहे.आमदार श्री. बावनकुळे यांच्या शिष्टमंडळाने जुन्या नियमावलीनुसार कामकाज सुरू ठेवण्याची विनंती केली असल्याने त्याबद्दल सकारात्मक चर्चा करण्यात आली. या बैठकीला राज्यातील स्काऊट्स आणि गाइड्सचे पदाधिकारी उपस्थित होते.

# अनधिकृत बांग्लादेशी फेरीवाल्यांवर कडक कारवाई करावी : महिला व बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा

मुंबई : आरे स्टॉलसमोर अनधिकृत बांग्लादेशी फेरीवाल्यांच्या होणाऱ्या त्रासामुळे नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे हे लक्षात घेता अनधिकृत बांग्लादेशी फेरीवाल्यांवर तत्काळ कडक कारवाई करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी प्रशासनाला दिले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबीर कार्यक्रमात कुर्ला (पश्चिम) एल वॉर्ड येथे आज ६८९ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी १३० तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यात आले आहे. उर्वरित तक्रारी देखील वेळेत निराकरण करून समस्या प्राधान्याने सोडविण्याचे निर्देश पालकमंत्री श्री. लोढा यांनी दिले. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.

यावेळी महिलांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली तसेच बँका आणि महिला आर्थिक विकास महामंडळ आणि विविध विभागांचे स्टॉल लावण्यात आले होते. या स्टॉलमध्ये शासनाच्या विविध विभागांकडून महिलांकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती महिलांना




देण्यात आली.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबीर कार्यक्रम आयोजित केला आहे.

हा उपक्रम ३१ मे २०२३ पर्यंत दुपारी ३ ते ५.३० वाजता सुरू राहणार आहे. या उपक्रमात महिलांना तक्रारीसाठी प्रत्येक वॉर्डमध्ये ऑनलाईन अर्जही करता येणार आहेत. अधिक माहितीसाठी व अर्ज भरण्यासाठी https://forms.gle/7GzCS-CLYsj38amq9 या लिंकवर जाऊन माहिती भरता येणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# जेऊर जिल्हा परिषद मराठी प्रशालेच्या प्रांगणात शासन आपल्या दारी उपक्रम संपन्न



अक्कलकोट/प्रतिनिधी: जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या आदेशानुसार व उपविभागीय अधिकारी मनिषा अवाळे, तहसीलदार बाळासाहेब शिरसाट यांच्या नेतृत्वाखाली जेऊर येथे शासन आपल्या दारी उपक्रम पार पडले. मंडलाधिकारी आर.एस.भाजगी,तलाठी टी.वी घुगे, कृषी सहाय्यक देगील ,तलाठी सचिन चव्हाण, घुगे, हिरेमठ, बोरे,आरोग्य अधिकारी डॉ. सलगरे पुरवठा निरीक्षक एप एम शेख, संजय गांधी निराधार योजनेचे अ.कारकून माढे ,सरपंच पार्वती झंपले, उपसरपंच काशिनाथ पाटील, माजी सरपंच शिवाजी कलमदाने, पोलीस पाटील रहिमान अत्तार, ग्रामपंचायत विभागचे कर्मचारी गंगाधर इरशेट्टी, गौडगावचे सरपंच बनसोडे सरपंच ग्रामविकास अधिकारी सुरेश कोळी, दोड्याचे पोलीस पाटील शैलेंद्र नाडगम, हंजगीचे पोलीस पाटील मोहन वाघमोडे आदी सह ग्रामस्थ उपस्थित होते. बोरिकरजगी,होटकर,हिरेमठ या तीन शेतकरयांना ट्याक्टर देण्यात आले.महा-ई-सेवा विभाग आरोग्य विभाग पुरवठा विभाग या सर्व विभागातून लाभार्थ्यांना लाभ देण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर आजगोंडे यांनी केले तर आभार रहिमान अत्तार (पोलीस पाटील) यांनी मानले,

# जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक दत्तात्रय कमते यांची मुख्याध्यापक पदी निवड

पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जिल्हा परिषद कुमार विद्यामंदिर टाकळीवाडी शाळेतील शिक्षक दत्तात्रय कमते यांची मुख्याध्यापक पदी निवड झाली. यांची बदली जिल्हा परिषद शाळा घोसरवाड तालुका शिरोळ येथे झाली आहे. कोल्हापूर शिक्षण विभागाने नुकतीच बढती दिली. यांची नोकरीची सुरुवात शाहुवाडी तालुक्यातून झाली. येथे ३वर्षे सेवा बजावल्यावर त्यांची नियुक्ती जिल्हा परिषद दतवाड शाळा येथे झाली. येथे २४ वर्षे सेवा बजावली. अनेक चांगल्या विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम त्यांनी केले. अनेक विद्यार्थी उच्च पदावर काम करत आहेत. सन २०१६ वर्षी त्यांची बदली टाकळीवाडी येथील कुमार विद्या मंदिर मध्ये झाली. पदवीधर अध्यापक म्हणून झाली.



७ वर्षे आपली सेवा बजावून शाळेच्या प्रगतीत आपले योगदान दिले. गावातील नागरिकांचा, पालकांचा, सहभाग चांगला राहीला.येथील उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार, ऋग्वेद पुरस्कार, बाल रक्षक पुरस्कार मिळाले. अनेक सामाजिक ,शैक्षणिक, उपक्रम राबवले. सर्व शासकीय योजनांची शंभर टक्के अंबलबजावणी केली.शैक्षणिक उठावातून शाळेची प्रगती केली. साने गुरुजी शिक्षक पतसंस्था संचालक म्हणून निवड झाली. अनेक विद्यार्थी केंद्रात सरसावले. क्रीडा, सांस्कृतिक, स्पर्धेमध्ये अनेक विद्यार्थ्यांना घडवले. तालुक्यात,जिल्ह्यात, शाळेचे नाव रोशन केले.३४ वर्षाच्या सेवेनंतर आता त्यांना मुख्याध्यापक पदी निवड झाली.

# शासन आपल्या दारी अंतर्गत मोहोळमध्ये साडेचार हजार जणांना लाभ वाटप

सोलापूर/प्रतिनिधी : शासन आपल्या दारी व महाराजस्व अभियानांतर्गत तहसील कार्यालय, मोहोळच्या वतीने आयोजित महाशिबिरात जवळपास ४ हजार ५३७ लाभार्थीना वेगवेगळे लाभ देण्यात आले. तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी ही माहिती दिली. तहसीलदार प्रशांत बेडसे म्हणाले, जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे आणि उपविभागीय अधिकारी गजानन गुरव यांच्या मार्गदर्शनखाली दि. २२ ते २९ मे या कालावधीत महसूल मंडळ स्तरावर महाशिबिरांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महसूलसह कृषि, गट विकास अधिकारी, पशुसंवर्धन, उद्योग, आरोग्य, कामगार, महिला व बालविकास अशा अनेक विभागांनी सक्रिय सहभाग घेतला. या महाशिबिरास आमदार यशवंत माने यांनी भेट देऊन पाहणी केली. त्यांच्या हस्ते लाभार्थींना दाखले, प्रमाणपत्र, लाभ वाटप करण्यात आले. या महाशिबिरात दिलेला लाभ दिलेली संख्या पुढीलप्रमाणे



- पाणंद रस्ते खुले करणे - २०, जातीचे दाखले - ४६०, रहिवासी दाखले - ६६२, उत्पन्न दाखले - २२८०, नॉन क्रिमी लेयर दाखले -१५३, प्रधानमंत्री किसान सन्मान - १८१, संजय गांधी योजना - १६४, इतर विभाग - ६३७ इतके दाखले वाटप करण्यात आले आहे

# ‘क्रांतिसूर्याची महानायिका रमाई’ हे काळजाला भिडणारे स्वकथन : प्रा.दामोदर मोरे

मुंबई : वडाच्या खोडातून ज्या प्रमाणे फांद्या, फांद्यातून,पाने, फुले,फळे उमलतात, त्या खोडाप्रमाणे लेखकाच्या‘मी’ मधून स्वकथनातील घटना , प्रसंग, व्यक्तिरेखा, संवाद, आठवणी उमलत असतात. पानांचे , फुला फळांचे जे खोडाशी नाते असते तेच नाते स्वकथनातील प्रत्येक वर्णनाचे 'मी' शी असेल तरच ते स्वकथन एकात्म, एकजीवी होते. पण पिंपळाची फांदी वडा लावायचा प्रयत्न झाला तर ते स्वकथन विश्वासार्हता गमावते. 'क्रांतिसूर्याची महानायिका रमाई ', हे स्वकथन एकजीवी झाले आहे. प्रांजळपणा आणि प्रवाहीपणा, प्रभंजकता आणि प्रबुद्धता , अस्पृश्यतेचे आणि दारिद्र्याचे भेदक अनुभव तसेच रमाई आपल्याशी थेट संवाद करीत असल्यामुळे हे स्वकथन काळजाला भिडते. असे प्रतिपादन ख्यातनाम मराठी - हिंदी जेष्ठ साहित्यिक प्रा.दामोदर मोरे यांनी केले. मुंबईत दादर येथील आंबेडकर भवनात रमाई यांच्या ८८व्या स्मृतिदिना निमित्त २७ में २०२३ रोजी आयोजित, वाल्मिका



एलिंजे लिखीत 'क्रांतिसुर्याची महानायिका रमाई ' या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ॲड. जी.डी. घोक्षे हे होते. या प्रसंगी बोलतांना समीक्षक डॉ.शशिकांत लोखंडे म्हणाले कि, एक स्त्री' म्हणून रमाईला बोलके करताना लेखिकेने कुठेही तिचे 'मानवीपण' नष्ट होऊ दिले नाही.वाल्मिका ताईंची रमाई 'आपल्यातील' आहे.प्रा.उषाताई काळे यांनी बोलतांना या मौलिक ग्रंथ लेखनाबद्दल लेखिकेचे हार्दिक अभिनंदन केले. प्रा.आशालता कांबळे यांनीही ग्रंथावर भाष्य केले. आंबेडकर साहित्याचे संशोधक विजय सुरवाडे,शिवा इंगोले आणि ग्रंथाचे प्रकाशक रावसाहेब आहिरे, विचारमंचावर उपस्थित होते. ह्या शानदार समारंभात ग्रंथाचे प्रकाशक आंतरराष्ट्रीय ख्यातीचे व्यंगचित्रकार अशोक सुतार , जीवनसंघर्षकार नवनाथ रणखांबे , सुबोध मोरे , छाया कोरेगावकर, सुरेखा पैठणे, अनंत धनसरे, प्रा. प्रदीप जानकर कुंदा निळे इ. उपस्थित होते. या सुंदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार विठ्ठल कांबळे यांनी केले

# माजी सैनिक पेन्शनबाबत अडचणी निराकरणासाठी दोन दिवसीय शिबिरास प्रतिसाद

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूरसह इतर जवळच्या जिल्ह्यातील निवृत्तीवेतन धारक माजी सैनिक/ माजी सैनिक विधवा पत्नी यांना स्पर्श (SP-RSH) बाबतची माहिती देण्यासाठी तथा हयातीच्या दाखले तसेच निवृत्ती वेतनाबाबत माहिती व त्यासंबंधित अडीअडचणी सोडविण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत दोन दिवसीय शिबिर घेण्यात आले.सैनिक कल्याण विभाग पुणे यांच्या निर्देशानुसार जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे घेण्यात आलेल्या या शिबिराचे उद्घाटन कर्नल नवीन बेंद्रे (निवृत्त) OIC ECHS Polyclinic, Solapur यांच्याहस्ते करण्यात आले. या शिबिरात रक्षा लेखामहानियंत्रक यांच्यामार्फत PCD-(Pension), प्रयागराज यांच्या टीमचे दोन प्रतिनिधी, Records Artillery, Nashik यांचे मार्फत 01 JCO d 01 NCO, Bombay Engineer Group, Pune यांच्या मार्फत 02 NCO, Records Mech Infantry यांचे मार्फत 01 JCO d 01 NCO, 2 Wingh -irforce Pune यांच्यामार्फत 01 NCO स्टेशन हेडक्वार्टर मार्फत 1 NCO तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया, बाळीवेस शाखा यांच्यामार्फत ०४ प्रतिनिधी उपस्थित होते.या शिबिरात सोलापूर जिल्ह्यासह उस्मानाबाद, लातूर, पुणे, सातारा व सांगली जिल्ह्यातील सुमारे ५४९ निवृत्तीवेतन धारक माजी सैनिक, माजी सैनिक विधवा पत्नी व त्यांचे अवलंबीत उपस्थित होते. सदर टीम कडून उपस्थितांना त्यांच्या स्पर्श व इतर अडचणींचा निपटारा अतिशय चांगल्या प्रकारे करुन माजीसैनिक / माजी सैनिक विधवा पत्नी यांचे मनोबल वाढविले. प्रास्ताविक जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे गुरुनाथ कुलकर्णी यांनी तर आभार सुनिल जाधव यांनी मानले. शिबिर यशस्वी करण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील वरिष्ठ लिपिक सुनिल जाधव,

लक्ष्मण कोळी, गुरुनाथ कुलकलर्णी, दिनेश नागणे, सतीश रासकर, अप्पासाहेब कोडग, उमेश राठोड, एम यू मुल्ला, राजेसाहेब शेख, मिथुन ताकमोगे, गणपत आडद आदिंनी परिश्रम घेतले. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद दे. तुंगार उपस्थित होते

## शिव-बसव डॉ बी. आर.आंबेडकर मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त १६ जोडप्यांचा विवाह संपन्न


अक्कलकोट/ प्रतिनिधी: विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२व्या जयंतीनिमित्त शिव- बसव डॉ.बी.आर.आंबेडकर मागासवर्गीय सामाजिक संस्थेच्या वतीने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदिप मडिखांबे यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाने सोळा जोडप्यांचा विवाह बौद्ध पद्धतीने लावण्यात आला,भारत हा देश विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत असला तरी अजूनही भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेतकरी आत्महत्या करत असतात त्यातील एक कारण म्हणजे शेतकऱ्यांना आपल्या मुला-मुलींचे लग्न लावण्यासाठी पुरेसा पैसा उपलब्ध नसतो त्यामुळे शेतकरी आत्महत्या करत असतो,अशाच गोरगरीब व दुर्बल कुटुंबातील मुला मुलींचे संसार उभा करण्याचे काम शिव-बसव-डॉ. बी.आर.आंबेडकर मागासवर्गीय सामाजिक संस्था ही गेल्या सहा वर्षापासून करत असून संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत गेल्या सहा वर्षात ९१ जोडपी विवाहबद्ध झाली आहेत , शिव-बसव- डॉ.बी.आर.आंबेडकर मागासवर्गीय सामाजिक संस्था विविध सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय असे उपक्रम राबवत असून त्यातील एक प्रेरणादायी उपक्रम म्हणजे सामुदायिक विवाह सोहळा होय,या सामुदायिक विवाह सोहळ्यामध्ये शिव-बसव-डॉ.बी.आर.आंबेडकर मागासवर्गीय सामाजिक संस्था यांच्याकडून ज्या जोडप्यांचा विवाह संपन्न झाला अशा जोडप्यांना पुष्पहार, गुच्छ,



संसारोपयोगी भांडी, बेड, वधू-वराला विधीचा पांढरा पोशाख,वरांना सूट,बूट, वधुला शालु, सँडेल व तसेच मणी-मंगळसूत्र व पायातील जोडवे व तीन लाख रुपयांपर्यंत अपघात विमा , पहिली मुलगी झाल्यास तीन हजार रुपयाची ठेव , अशा विविध सोयी सुविधा पुरविण्यात आल्या त्या प्रमाणे सर्व वऱ्हाडी मंडळींना जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती, व तसेच नवनियुक्त पोलीसांचा विशेष सत्कार करण्यात आला , यावेळी आगामी काळात संस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातील असे आश्वासन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदिप मडिखांबे यांनी दिले , हा विवाह सोहळा यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले या विवाह सोहळ्यात भन्ते बी. सारीपुत्त, प.पु. गुरूलिंग महास्वामीजी हिरेमठ (बंगरगा मठ) , ख्रिश्चन धर्मगुरू ठर्शी.राम अलमेलकर , राष्ट्रवादी नेते सुधीरजी खरटमल , मा. उपनगराध्यक्ष यशवंत तात्या धोंगडे, वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश मालक इंगळे , अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त अमोलराजे भोसले, भैय्यासाहेब खैरे पाटील , मा.नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, मा. नगराध्यक्ष महेशजी हिंडोळे , RPI (A) ता. अध्यक्ष अविनाश मडिखांबे , डॉ. सतिश बिराजदार , वकील ड. विजय हार्डिकर , ड. अनिल मंगरूळे , ( स्नेहलोक फाऊंडेशन प्रमुख ) काशिराया काका पाटील, वंचित बहुजन आघाडीचे ता. चंद्रशेखर मडिखांबे, मा.उपसभापती विलासजी गव्हाणे , राष्ट्रवादी ता.अध्यक्ष दिलीप सिध्दे , भाजप नेते मनोज कल्याणशेट्टी , कुरनूर सरपंच व्यंकट मोरे, प्रहार यु. जिल्हाध्यक्ष राजेश चव्हाण ,

रासप नेते सुनिल बंडगर, मा. मेजर शिवपुत्र घटकांबळे , नगरसेवक सद्दाम शेरीकर , युवा नेते महेश माने , भाजपा नेते नैनू कोरबू , मा.नगरसेवक नागेश कुंभार ,मा. नगरसेवक केरबा होटकर , विजयकुमार शिंदे (अडत व्यापारी सोलापूर) , संजय ( मामा) बनसोडे , पत्रकार कमलाकर सोनकांबळे , ठझख नेते विजयकुमार पोतेनवरू, युवा नेते दत्ता कांबळे , (उपसरपंच चुंगी)महादेव माने , युवा उद्योजक परमेश्वर चव्हाण , सांगवी सरपंच बाळासाहेब भोसले , गणपतराव कलशेट्टी, व तसेच पत्रकार बांधव पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच हा विवाह सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विवाह सोहळा समिती अध्यक्ष विकास गायकवाड व सर्व पदाधिकारी , भिमप्रकाश मागासवर्गीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिलामणी दादा बनसोडे व तसेच संत कक्कया महाराज युथ फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष उत्तम इंगळे व तसेच संस्थेचे मार्गदर्शक विनोद थोरे सर यांचे देखील विशेष सहकार्य लाभले हा विवाह सोहळा यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी महादेव बनसोडे , हर्षवर्धन सोनकांबळे , मरेप्पा शिवशरण , सिद्धार्थ साळे , प्रणेश बनसोडे, महेश घटकांबळे, अजय मुकणार , विरुपाक्ष माने , दशरथ मडिखांबे ,शेखर कुंभार, संगय्या होळीकट्टी ,दिलीप कुंभार, उत्तम बनसोडे , महेश नडगम, गणेश बनसोडे , गौतम घाटगे , महादेव थोरे , प्रशांत मडिखांबे , बंटी नडगम , परशुराम भगळे , शेखर सोनकांबळे , शाहीर जैनजांगडे , शार्दुल रसनभैरे, दैवत थोरे , गंगाराम वाघमारे , राजू भगळे , यादव होटकर , मंजू नाईकनवरे, अमित दुपारगुडे ,राहुल भगळे , शाहिद दारूवाले , रहिम बिराजदार, राजरत्न थंब , संतोष सोनकांबळे, कृष्णा राजापूरे , समर्थ शिंदे , आदींसह पदाधिकारी कार्यकर्त्यांनी विशेष सहकार्य केले

## शब्दकोडे क्र १३



आडवे शब्द १. चिंचा आल्यात पाडाला- या गीतातील पुढील ओळ ७. वैदूकडची औषधे १०. थेट, सरळ ११. हा खाताना घशात काटा अडकतो १२. मालाचा उठाव १४. मिळाला म्हणजे फायद्याचाच ठरला की! १५. जिजाबाईंचा पुत्र १७. जिरवण्याची ताकद २०. आवडता, प्रिय २१. नंतरचे नवराबायको २२. नमुनेदार २५. दक्षिणा वाटण्याची जागा २७. अति भयानक २९. रेशमाची गुंडाळी (अ.व.) ३०. 'कँटीन' असल्यावर हा कशाला? ३३. भलतेच विरुद्ध ३५. निर्बुद्ध, ढ ३६. दोनवेळा म्हटल्यास कटकट ३७. या काळातील घटना कुणाला कळल्यात! ३८. चकमक ४०. त्वरित, रातोरात ४१. रानरेडा ४२. नातवंडे म्हणजे दुधावरची --! ४३. दुलई ४४. उत्तराधिकारी ४७. फटाक्यात ठासून भरलेला मसाला ४८. काळ्या तोंडाचे माकड ५१. खोदकाम ५२. लिंबूपाणी ५४. न्याहरी-कधी उपासाची, कधी दिवाळीची! ५५. दुसऱ्यासाठी खिशाला चाट ५७. ओळख पटवणारे वैशिष्ट्य ५९. संपणे ६०. जन्मदाता, पिता ६१. माळी ६३. जगातील सगळ्यात घातक कीटक ६५. 'आ'काराची रेषा ६६. आमिषादाखल दाखवण्याचे कंदमूळ ६७. हे शहर काही आता पेन्शनरांचे राहिलेले नाही ६८. पंख ६९. किमान हालचाल ७१. वृद्ध ७२. '--सांगे ज्याला त्याला, वेड लागले राधेला' ७३. धमनी ७४. लोकरूढी, प्रथा ७७. बूड ७८. कोंब, अंकुर ७९. भिंतीवरून सरपटणारा प्राणी ८०. कबूतर ८१. दक्ष, दक्षतेचा इशारा

उभे शब्द १. जादूगाराचे कौशल्य-शर्विलकाच्याही हाती २. शेवट ३. हुबेहूब सोंग वठवणारा ४. घराची अब्रू घालवणारा ५. शंकराचे एक नाव ६. तिबेटी धर्मगुरु ७. पत्ता, शोध ८. तट्ट, फुगलेले ९. लक्ष पण अवधान नाही ११अ. गणेशमंदिरामुळे प्रसिद्ध असलेली पुण्यातील बाग १३. मजल, टप्पा १६. नियमित यात्रा करणारा १८. भरपूर कमाईचे 'जाडजूड; विशेषण १९. दरी २२. बांधकामासाठी कालवलेले मिश्रण २३. फुलांचे दागदागिने २४. टाळ्यांचा आवाज २६. सुकवलेली काळी द्राक्षे २८. रात्रभर ३१. लहान मूल ३२. आदित्यवार ३४. संत ज्ञानेश्वारांनी केलेली प्रार्थना ३५. बंदी, मज्जाव ३७. शिवशाहीचा ध्वज ३९. लिहिलेला लेख, संदेश इ. ४०. बांबूची मोठी टोपली, हारा ४५. एकरुप ४६. काम इ. लांबणे ४८. वारा, वायू, त्रास ४९. कच्चे लिखाण (इंग्रजी) ५०. वेदनेने ओरडणे, हळहळ व्यक्त करणे ५२. हुक्की, लहर ५३. अव्यवस्था, गोंधळ ५५. पाठशिवणीचा खेळ ५६. -- --- म्हणून लांडोरही नाचते (म्हण) ५७. हिंदीत रक्त ५८. चक्र ६०. पशू ६२. पुरुष ६४. राजाचा सैनिकी अधिकारी ६५. कान व डोळा यामधील भाग ६७. प्राचीन, जुने ७०. टक, दृष्टी ७५. कोरा ७६. त्याप्रमाणे

# नागालँडमध्ये रिपब्लिकन पक्षाचे आमदार निवडून येतात मग महाराष्ट्रात का नाही याचा विचार करून कार्यकर्त्यांनी निवडून येण्यासाठी काम करावे : केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले

## प्रकाश आंबेडकरांनी माझ्या सोबत भाजपकडे यावे त्यामुळे समाजाला सत्तेचा मोठा लाभ मिळवून देता येईल





मुंबई : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर चालणारा तळागाळातील अन्यायग्रस्त अनुयायांना न्याय मिळवुन देणारा एकमेव पक्ष म्हणजे रिपब्लिकन पक्ष. आम्ही ज्यांच्या सोबत उभे राहिलो तो पक्ष सत्तेत येतोच मग तो काँग्रेस असो वा राष्ट्रवादी, रिपाइं फक्त सत्ते बरोबर जाणारा पक्ष नसुन तर सत्ता हस्तगत करणारा पक्ष आहे. ही किमया फक्त आणि फक्त रिपाइं पक्षातच आहे. सद्याच्या भाजप सरकारमध्येही रिपाइंची महत्वाची भुमिका आहे.नागालँड मध्ये रिपब्लिकन पक्षाचे २ आमदार स्वबळावर निवडून आले.मग महाराष्ट्रात आर पी आय चे आमदार का निवडुन येऊ शकत नाहीत.कार्यकर्त्यांनी आपले आमदार निवडून येण्यासाठी शिस्तबद्ध काम करावे असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले. शिर्डी येथे आयोजित रिपाइंच्या राष्ट्रीय अधिवेशनाप्रसंगी ना.रामदास आठवले बोलत होते. विचारमंचावर महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील होते. रिपाइं चे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरवदे; राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर; नागालँड चे आमदार एमटी चोबा; लिमा ओनन चँग; राज्य कार्याध्यक्ष बाबुराव कदम; राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे; सौ.सिमाताई आठवले, जित आठवले,युवक आघाडीचे राज्य अध्यक्ष पप्पू कागदे; डॉ विजय मोरे महिला आघाडीच्या राज्य अध्यक्ष चंद्रकांता सोनकांबळे; सूर्यकांत वाघमारे; रमेश मकासरे; अशोक गायकवाड; संघमित्रा गायकवाड; जिल्हा अध्यक्ष सुनील साळवे; विनोद निकाळजे; शिलाताई गांगुर्डे; ऍड.आशाताई लांडगे; विजय वाकचौरे; श्रीकांत भालेराव; जील्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, भिमा बागूल, सुनील साळवे, पप्पु बनसोडे, दीपक गायकवाड ; धनंजय निकाळे, राजेंद्र पाळंदे, आदी मान्यवर उपस्थित होते. प्रकाश आंबेडकरांनी उद्धव ठाकरे किंवा इतर ठिकाणी न जाता माझ्या सोबत भाजप कडे यावे. आम्ही दोघांनी ही भाजप शी युती केल्यास आपल्या समाजाला त्यातुन सत्तेचा मोठा लाभ मिळवून देता येईल असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले. ना. रामदास आठवले पुढे म्हणाले की, मी येथे हार तुरे घेण्यासाठी आलो नाही तर पक्षाचे ध्येय धोरणं राबविण्यासाठी आलो आहे. आज आपल्याला चिंतन करण्याची गरज आहे.पुष्पहार घालून क्रांती होत नाही. नागालँड मध्ये रिपाइंचे २ आमदार निवडुन येतात मग महाराष्ट्रात का नाही? याचे आत्मचिंतनही कार्यकर्त्यांने करणे गरजेचे आहे.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ख-या अर्थाने विचार रुजवायचे असतील तर स्वयंशिस्त महत्वाची आहे. ते पुढे म्हणाले आज झालेल्या नविन संसद भवनाचे उद्घाटन हा ऐतिहासिक क्षण आहे. या वास्तुमुळे देशाच्या वैभवात भर पडली आहे असे गौरउद्गार ना. रामदास आठवले यांनी काढले.

यावेळी बोलतांना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की,आपल्या सर्वांचे नेते रामदास आठवले राजकारणात मैत्री जपणारे व्यक्तीमत्व आहे. त्यांचा पिंड संघर्षाचा आहे. एन.डी.ए. मधून अनेक पक्ष बाहेर पडले, पण जनतेच्या विकासासाठी ना. रामदास आठवले बाहेर पडले नाही. स्वाभीमानाने राहिले. कार्यकर्त्यांनी त्यांना शिर्डी मधून निवडून आणण्याची काळजी करु नये. त्यासाठी भाजप सक्षम आहे. इंदू मीलमध्ये उभारण्यात आलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक सर्व समाजाला समर्पित आहे. या स्मारकातून बाबासाहेबांच्या विचारांची प्रेरणा घेणा-या अनेक पिढया घडतील.असे ना.राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले. रिपाइं चे अन्य राज्यांतील पदाधिकारी दिल्ली चे माजी मंत्री संदीप कुमार; हरियाणा चे सोनू कुंडली; वेंकट स्वामी ( कर्नाटक) ; ब्रह्मानंद रेड्डी( आंध्र प्रदेश) नागेश्वराव गौड; रवी पसूला; गोरख सिंग ( तेलंगणा) उषा आफळे ( छत्तीसगड) राजस्थान चे ऍड. नितीन शर्मा; आरती बेहरा अनिल सिंग ;आदी उपस्थित होते.

## मोफत रायगड मोहिम आयोजित

अक्कलकोट/प्रतिनीधी : छत्रपती शिवाजी महाराजांच्या दि.६ जून २०२३ रोजीच्या ऐतिहासिक ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा समिती यांच्यावतीने मोफत रायगड मोहिम आयोजित करण्यात आल्याची माहिती आतिश पवार यांनी दिली आहे.

समितीचे आधरस्तंभ श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सदरच्या मोहिमेचे आयोजन करण्यात आली असून शिवभक्तांनी जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदविण्याचे आवाहन अंकुश चौगुले यांनी केले आहे. याकरिता योगेश पवार ८२०८०६५४९४ अंकुश चौगुले ९९६०६६२४२४, बालाजी पाटील ८०८७००२८९५, अशोक जाधव ९९२११४२६७१, प्रसाद मोरे ७५०७८९७६५५, विशाल घाटगे ९६०७७९९३८६, राजाराम पवार ८९७५५६६५४७, लक्ष्मण शिंदे ९३५९८५५९३०८, भरत राजेगावकर ९५२७५९५२६१, अभिषेक चव्हाण ८६०५५१४७२७, अजय शिंदे ८०१०३२७४४९, गणेश पाटील ९५४५११६१४३, शुभम सुरवसे ७४१०५१८२५८ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन योगेश पवार यांनी केले आहे.

## शासन आपल्या दारी अंतर्गत बार्शी तालुक्यात महाशिबिरात साडेआठ हजारहून अधिक दाखले वाटप

सोलापूर/प्रतिनिधी : शासन आपल्या दारी व महाराजस्व अभियानांतर्गत तहसील कार्यालय, बार्शीच्या वतीने आयोजित महाशिबिरात ८ हजार ६९४ दाखले वाटप करण्यात आले. तहसीलदार अंजली मरोड यांनी ही माहिती दिली.

तहसीलदार अंजली मरोड म्हणाल्या, जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे आणि उपविभागीय अधिकारी विठ्ठल उदमले यांच्या मार्गदर्शनखाली दि. २२ ते २६ मे या कालावधीत महसूल मंडळ स्तरावर महाशिबिरांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महसूलसह कृषि, पशुसंवर्धन, उद्योग, आरोग्य, कामगार, महिला व बालविकास अशा अनेक विभागांनी सक्रिय सहभाग घेतला. या महाशिबिरास आमदार राजेंद्र राऊत यांनी भेट देऊन पाहणी केली. त्यांच्या हस्ते लाभार्थींना दाखले, प्रमाणपत्र, लाभ वाटप करण्यात आले. या महाशिबिरात दिलेला लाभ दिलेली संख्या पुढीलप्रमाणे – सीमांत शेतकरी गट बांधणी – प्रती गाव एक – गट नोंदणी प्रमाणपत्र एकूण लाभार्थी – ३०, महाडीबीटी – कृषि अभियांत्रिकीकरण योजना एकूण



पूर्व संमती लाभार्थी – ६६७, ई – श्रम कार्ड – ४३५, सर्व निधी योजना – ६००, इमारत बांधकाम योजना – १६, रेशनकार्ड –४४२, संजय गांधी व श्रावणबाळ योजना – २९२, ज्येष्ठ नागरिक कार्ड – ५३, जात प्रमाणपत्र – ७४, रहिवासी, उत्पन्न,जन्म, मृत्यू इ.दाखले – ३४४९, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना – १४, बचतगट (१५००० रूपये लाभ) – २२५, गायी, म्हशी व शेळी, मेंढी वाटप – १७, महिलांना शिलाई मशीन वाटप – ३०, इतर योजना (विधवा, अपंग, दारिद्र्य रेषेखालील) – २९१, वीज जोडणी, माती परीक्षण – १५, दिव्यांग साहित्य वाटप – ६०, डिजीटल इंडिया अंतर्गत शासनाच्या डिजीटल सुविधांची माहिती व प्रशिक्षण – ११, शेतकरी ते ग्राहक थेट बाजारपेठ – २३, नवमतदार नोंदणी – २५१, मुलींना सायकल वाटप – ३८, मनरेगा (जि. प. व कृषि विभाग) – २००, घरकुल योजना (पं. स. ,न.पा ,म. न. पा.) – ३४०, पी. एम. एफ. एम. इ. (P.M. Formalization of Microfood Enterprises - 31, नोंदणी – ३९, पी. एम. किसान माहिती दुरूस्ती – ४३२, आधार कार्ड, पॅन कार्ड, पास पोर्ट – ८७, शासकीय कर्मचारी आस्थापना विषयक प्रलंबित बाबी व निवृत्ती विषयक लाभ – ४, सेवा केंद्राचे परवाने – २९, इतर योजनांचे लाभार्थी ३०७.असे दाखला वाटप करण्यात आले

## निवडणुकी यश मिळवून वर्चस्व सिध्द करण्यासाठी झटलेल्या माझ्या शेतकरी बांधवांचे श्रेय असून त्याच्या विकासासाठी प्रयत्न करू : सिद्रामप्पा पाटील



अक्कलकोट/प्रतिनिधीः : माझ्या व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट व दुधनी बाजार समितीसह स्वामी समर्थ सह.साखर कारखान्यावर वर्चस्व सिध्द करण्यासाठी झटलेल्या माझ्या शेतकरी बांधवांना श्रेय असून, श्री बसवेश्वर मार्केट यार्डाच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्द आहे. बाजार समितीच्या हितार्थ कार्य करताना शेतकरी, व्यापारी यांची सांगड घालून कायापालट विकासकामे हाती घेतले जातील असे मनोगत अक्कलकोट बाजार समितीचे नूतन सभापती माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांनी व्यक्त केले.ते सोमवारी अक्कलकोट अडत व्यापारी असोसिएशनच्यावतीने समितीच्या सभापती व उपसभापती व संपूर्ण संचालक मंडळाचा सत्कार बाजार समितीच्या शेतकरी भवनात आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी सिद्रामप्पा पाटील हे बोलत होते.अध्यक्षस्थानी असोसिएशनचे अध्यक्ष गुंडू घिवारे हे होते.

यावेळी उपसभापती अप्पासाहेब पाटील, संजीवकुमार पाटील, प्रकाश कुंभार, मल्लिकार्जुन पाटील, कार्तिक पाटील, बसवराज माशाळे, बाबुशा करपे, श्रीशैल घिवारे, यलप्पा ग्वल, शिवमंगल बिराजदार, पार्वतीबाई स्वामी यांचा सत्कार करण्यात आला.

दरम्यान सभापती सिद्रामप्पा पाटील यांचा सत्कार ज्येष्ठ व्यापारी प्रकाश किलजे तर उपसभापती अप्पासाहेब पाटील यांचा सत्कार असोसिएशनचे उपाध्यक्ष सिध्देश्वर भंडारे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संचालक मल्लिकार्जुन पाटील यांनी देखील मनोगत व्यक्त केले.

यावेळी व्यापारी काशिनाथ हिळ्ळी, संगमेश्वर हिप्परगी, गुरु उण्णद, अशोक तेलुणगी, समर्थ धनशेट्टी, कल्याणपा बिराजदार, शिवशंकर बाबा,अप्पू बिराजदार, रमेश कणबसे, अशोक कोकरे, चन्नप्पा हळगोदे, शिवशरणप्पा सरसंबे, महेश तडकल, गुंडप्पा उण्णद, स्वामीनाथ गंभीरे, महादेव उण्णद, गुरुशांत कुंभार, ओम कत्ते, सुभाष बगले, राजु कोळी, गौरीशंकर बहिरगोंडे, शब्बीर बागवान, असोसिएशनचे सचिव मुसा बागवान, रोहित खोबरे, राहुल तेलुणगी यांच्यासह बहुसंख्य आडत व्यापारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विजयकुमार बिराजदार, आभार सोमनाथ हळगोदे यांनी मानले.सत्कारातनंतर मार्केट यार्डात सौदा लिलावास सभापती सिद्रामप्पा पाटील यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. तूर ९८००, हरभरा ५०५०, सोयाबीन ५१०० भाव मिळाला.

## करमाळा शहरामध्ये अचानकच वादळी वाऱ्यां सह तुफानी गारांचा पाऊस

करमाळा/प्रतिनिधीः करमाळा शहरामध्ये सोमवार दि. २९ मे रोजी दु. ४.३० च्या दरम्यान अचानक वादळी वाऱ्यासह तुफानी गारांचा पाऊस सुरु झाला. शहरातील नागरिकांना या वादळी वाऱ्याचा अंदाज येईपर्यंत गारांचा पाऊस सुरु झाला. गारांचा पाऊस बंद होईपर्यंत वादळी वारा आणि तुफानी पाऊस सुरु झाला. हा सदरचा पाऊस किमान १५ ते २० मिनिटे सलग सुरु होता. काही दिवसांपुर्वी तालुक्यामध्ये आतापर्यंतचे सर्वात मोठे



तुफानी वादळी वारे आले होते. या वादळी वाऱ्याने अनेक शेतकऱ्यांचे लाखो रु.चे नुकसान केले होते. आजच्या या वादळी वारा आणि पावसाने सुध्दा तशाच प्रकारचे स्वरुप धारण केले होते. त्यामुळे मागील काही दिवसांपुर्वी झालेल्या वादळी वाऱ्याप्रमाणे यावेळेस सुध्दा शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल काय? अशा प्रकारे प्रत्येकाला या वादळी वाऱ्याचा प्रत्यय येत होता.

## टाकळीवाडीतील एकाच कुटुंबातील तिघेजण आगळी वेगळी नाकाला जिभ लावणे कला जोपासत आहेत





टाकळीवाडी : नामदेव निर्मळे



टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील श्री नामदेव पुंडलिक निर्मळे यांची नाकाला जीभ लावण्याची कला असून १ मिनिटांमध्ये १४७ वेळा नाकाला जीभ लावून २०० देशाचे रेकॉर्ड विश्व विक्रम नोंदवला आहे. यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड साठी आता प्रयत्न सुरू आहेत. लहानपणापासूनच यांची नाकाला जीभ लागत होती. नाकाला जीभ लावणे ही कला आहे. व यातून एक रेकॉर्ड होऊ शकते हे पुढारी वर्तमानपत्रातील बातमीमुळे कळाले.

शिरोळ तहसीलदार मा. अपर्णा मोरे धुमाळ मॅडम यांनी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नाव नोंद होण्यासाठी पत्र दिले आहे. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत नामदेव निर्मळे यांच्या दोन्ही कन्या कुमारी स्वरा व कुमारी शौर्या या सुद्धा नाकाला जीभ लावण्यात पटाईत आहेत. मुली सुद्धा कुठल्या क्षेत्रात कमी नाहीत हे या मुलीने दाखवून दिले आहेत.यांची मोठी कन्या कुमारी शौर्या नामदेव निर्मळे वय ५ वर्षे ५ महिने २५ दिवस या वयात तिने १ मिनिटांमध्ये ७२ वेळा नाकाला जीभ लावलेली आहे. हिला जिल्हा परिषद कोल्हापूरचा तारंगणा पुरस्कार ८ मार्च २०२२ रोजी मिळालेला आहे. हिचे इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नाव नोंद झाले आहे. आता हिचे आशिया बुक रेकॉर्ड ऑफ साठी प्रयत्न चालू आहेत.

या कलेची दखल घेऊन जिल्हाधिकारी कोल्हापूर मा.श्री. राहुल रेखावार साहेब यांनी अभिनंदन पत्र देऊन यांना गौरविण्यात आलेले आहे. तसेच शिरोळ तहसीलदार मॅडम मा.सौ. अपर्णा मोरे धुमाळ मॅडम यांनी सुद्धा अभिनंदन पत्र देऊन यांना गौरवण्यात आलेले आहे.तसेच शिरोळचे पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मा. शंकर कवितके साहेब यांनी सुद्धा अभिनंदन पत्र देऊन याचे गुणगौरव केले आहे.यांची लहान कन्या कुमारी स्वरा नामदेव निर्मळे वय ३ वर्षे ३ महिने २८ दिवस या वयात तिने एका मिनिटांमध्ये ३८ वेळा नाकाला जीभ लावलेली आहे.

हिला जिल्हा परिषद कोल्हापूरचा तारंगणा पुरस्कार ८ मार्च २०२२ रोजी मिळालेला आहे. हिचे इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नाव नोंद झाले आहे. आता हिचे पण अशिया बुक ऑफ रेकॉर्ड साठी प्रयत्न चालू आहेत.

या कलेची दखल घेऊन जिल्हाधिकारी कोल्हापूर मा.श्री. राहुल रेखावार साहेब यांनी अभिनंदन पत्र देऊन यांना गौरविण्यात आलेले आहे. शिरोळ तहसीलदार मॅडम मा.सौ. अपर्णा मोरे धुमाळ मॅडम यांनी अभिनंदन करुन अभिनंदन पत्र दिले आहे. या कलेने सर्वांना आश्चर्यचकित करून टाकले आहे.

सर्वांचे लक्ष वेधले आहे. मूर्ती लहान कीर्ती महान आगळीवेगळी कला ही जोपासत आहेत. या कलेमुळे गावचे, तालुक्याचे ,जिल्ह्याचे, नाव रोशन झाले आहे. ✻ बेटी पढाओ बेटी बचाओ✻ या उपक्रमाला एक चालना मिळालेली आहे. हे कुटुंब या कलेक्षेत्रातून प्रसिद्ध झाल आहे. आता हे तिघेजण महाराष्ट्र शासनाच्या पुरस्कारासाठी शिफारस करत आहेत. जगा वेगळं कुटुंब अशी आता प्रचिती मिळत आहे.आम्हाला खंबीर साथ श्री गुरुदत्त शुगरचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर मा.राहुल दादा घाटगे, माझे गुरु श्री अनिरुद्ध शिपुगडे, पुढारी मीडिया ग्रुपचे चेअरमन मा.योगेश जाधव , आई मंगल निर्मळे, वडील पुंडलिक निर्मळे,बहीण अंजली निर्मळे,यांचे मोलाचे योगदान लाभले.